आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१५ मे २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पेट्रोल आणि डिझेलच्या दरात ३ रुपये तर सीएनजीच्या दरात २ रुपये वाढ

- नाफेड आजपासून राज्यात १२ रुपये ३५ पैसे किलो दरानं कांद्याची खरेदी सुरू करणार

- नीट युजी परीक्षा आता येत्या २१ जून रोजी होणार, पुढच्यावर्षीपासून परीक्षा संगणकावर

**आणि**

- प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांचं निधन

**<><><><><>**

जागतिक स्तरावर झालेल्या इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर तेल कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रत्येकी तीन रुपयांनी वाढ केली आहे. त्यामुळे मुंबईत साध्या पेट्रोलचा दर वाढून प्रती लीटर १०६ रुपये ६८ पैसे तर डिझेलचा दर प्रती लीटर ९३ रुपये १४ पैसे झाला आहे. स्पीड पेट्रोल ११५ रुपये ७५ पैसे प्रति लीटर दराने मिळेल.

मुंबईत सीएनजीच्या दरातही प्रतिकिलो २ रुपये वाढ झाली आहे. त्यामुळे मुंबईत सीएनजीचा दर प्रतिकिलो ८४ रुपये झाला आहे.

विमानाच्या इंधनावर आकारल्या जाणाऱ्या व्हॅटमध्ये राज्यशासनानं कपात केली असून आता १८ टक्क्यांऐवजी ७ टक्के कर आकारला जाईल. हा दर येत्या १४ नोव्हेंबर पर्यंत लागू राहील.

**<><><><><>**

नाफेड आजपासून राज्यात १२ रुपये ३५ पैसे किलो दरानं कांद्याची खरेदी सुरू करणार असल्याची घोषणा केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज

साताऱ्यात केली. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या अंतर्गत ५ लाख घरांच्या वितरणाच्या कार्यक्रमात त्यांनी ही घोषणा केली. यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात ६ लाभार्थ्यांना घराच्या चाव्या देण्यात आल्या. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी पुढच्या आठवड्यात बैठक घेण्याचं आश्वासनही त्यांनी यावेळी दिलं

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या अंतर्गत पुढच्यावर्षी १५ लाख घर बांधून पूर्ण करू आणि येत्या ५ वर्षात राज्याला बेघरमुक्त करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली. वर्षभरात ५ लाख घर बांधून पूर्ण झाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

**- - होल्ड - मुख्यमंत्री बाइट - -**

या कार्यक्रमामध्ये महाआवास अभियानाचे 2023-2024 यावर्षाचे राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण सर्वोत्कृष्ट विभाग या गटात कोकण, नाशिक आणि नागपूर हे विभाग पहिल्या तीन क्रमांकावर आहेत. तर राज्य पुरस्कृत आवास योजनेमध्ये नागपूर,अमरावती आणि नाशिक हे विभाग पहिल्या तीन क्रमांकावर आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेच्या ग्रामीणमध्ये विभागात गोंदिया जिल्हा पहिल्या स्थानी, पालघर दुसऱ्या आणि अकोला तिसऱ्या स्थानी आहे. राज्य पुरस्कृत आवास योजने नांदेड पहिल्या, अमरावती दुसऱ्या आणि वर्धा तिसऱ्या स्थानी आहेत. सातारा पालिकेनं उभारलेल्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण चौहान आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज झालं.

**<><><><><>**

वैद्यकीय पदवी अभ्यासक्रम प्रवेशासाठीची नीट युजी २०२६ ही परीक्षा येत्या २१ जून रोजी पुन्हा घेतली जाणार असल्याचं राष्ट्रीय परीक्षा संस्था– NTA ने आज जाहीर केलं. विद्यार्थ्यांना १४ जून पर्यंत प्रवेशपत्रं दिली जातील. परीक्षार्थींना परीक्षा शुल्काचा परतावा दिला जाईल असं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र

प्रधान यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत सांगितलं. नीट परीक्षा पुढच्या वर्षीपासून संगणक आधारित करण्याची घोषणा त्यांनी यावेळी केली.

**- - - होल्ड धर्मेंद्र प्रधान बाईट - - -**

एनटीएमध्ये ठोस सुधारणा करण्याची गरज असून भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अनियमितता टाळण्यासाठी परीक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील, असं प्रधान यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नीट यूजी २०२६ परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणी तपास करणाऱ्या सीबीआयने आज लातूर इथल्या एका खासगी प्रशिक्षण केंद्र संचालकांची चौकशी केली. शिवराज मोटेगावकर असं या केंद्र संचालकाचं नाव आहे. दोन दिवसापूर्वी सीबीआयच्या पथकाने लातूरमधल्या एका महाविद्यालयाच्या रसायनशास्त्राच्या प्राध्यापकाला ताब्यात घेतलं होतं. हे प्राध्यापक चार वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाले आहेत आणि नीट परीक्षेच्या रसायन शास्त्र विषयाच्या प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या समितीचे सदस्य आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत आयोजित करण्यात आलेली ‘महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) - 2026’ आता 21 जूनऐवजी 28 जून रोजी घेण्यात येणार आहे. राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात NTA कडून त्याच दिवशी नीट परीक्षा आयोजित करण्यात आल्याने केंद्रांवरील ताण टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. सुधारित वेळापत्रकानुसार पहिला पेपर सकाळी 10.30 ते 1 वाजेपर्यंत, तर दुसरा पेपर दुपारी 2.30 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत होईल. उमेदवारांना 16 जूनपासून mahatet.in या संकेतस्थळावरून प्रवेशपत्र डाउनलोड करता येणार आहेत.

**<><><><><>**

शिवसेना पक्षाचं नाव आणि पक्ष चिन्ह प्रकरणातल्या सुनावणीला विलंब होत असल्याप्रकरणी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाच्या राजकीय नेत्यांकडून होत असलेल्या वक्तव्यांवरुन सर्वोच्च न्यायालयानं नाराजी व्यक्त केली आहे. एकीकडे न्यायालयाकडून पुढची तारीख मागून घेतली जाते आणि दुसरीकडे सर्वोच्च न्यायालय याप्रकरणी निकाल देत नसल्याचं वक्तव्य प्रसारमाध्यमांमध्ये काही नेते करतात असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत म्हणाले. हे प्रकार सहन करुन घेतले जाणार नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. याप्रकरणी पुढची सुनावणी ३० जुलै रोजी होणार आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ आणि लेखक डॉ.आनंद नाडकर्णी यांचे आज सकाळी मुंबईतल्या एका रुग्णालयात प्रदीर्घ आजारानं निधन झालं. ते ६७ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर ठाण्यात अंत्यसंस्कार झाले.

एम.बी.बी.एस ची पदवी घेतल्यानंतर डॉ. नाडकर्णी यांनी मानसोपचारशास्त्रामध्ये एम.डी. केलं. व्यसनमुक्ती, तरुण आणि किशोरांची जडणघडण या क्षेत्रात त्यांनी जनजागृतीचं भरीव कार्य केलं. त्याकरता बदलत्या काळात मानसोपचार आणि समुपदेशनाचं महत्त्व पटवून देणारे अनेक अभिनव उपक्रम त्यांनी राबवले. डॉ. नाडकर्णी यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

मानसोपचाराला सामाजिक बांधिलकी मानून दीपस्तंभासारखं कार्य करणाऱ्या संवेदनशील व्यक्तिमत्त्वाला आपण मुकलो आहोत, अशा शब्दांत **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

**<><><><><>**

कोकणातल्या आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांना भरीव मदत द्यावी या मागणीसाठी आज काँग्रेससह विविध पक्षांच्या नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी धडक मोर्चा काढला. पोलिसांनी मंत्रालयाजवळ हा मोर्चा रोखल्याने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सरकारवर टीका केली. हे सरकार शेतकरी विरोधी असून कोकणातल्या शेतकऱ्यांना भरीव मदत मिळेपर्यंत लढा सुरू राहील असं सपकाळ म्हणाले.

कांद्याला मिळणाऱ्या अत्यल्प दरामुळे संतप्त झालेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांनी काल टाकळी ढोकेश्वर इथे नगर-कल्याण राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करत सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

शेतकऱ्यांच्या धान खरेदी, बोनस, पीकविमा आणि विविध प्रलंबित मागण्यांसाठी भंडारा जिल्ह्यात कारधा इथल्या वैनगंगा नदीवर काँग्रेसनं आंदोलन केलं.

**<><><><><>**

देशभरात २०२५ या वर्षात सुमारे साडे २२ हजार कोटी रुपयांचे सायबर फसवणुकीचे प्रकार समोर आले. यापैकी साधारण अकराशे कोटी रुपयांची प्रकरणं महाराष्ट्रातली होती, अशी माहिती दूरसंचार विभागाच्या मुंबई विभागाचे अतिरिक्त महासंचालक आशीष पाठक यांनी आज मुंबईत दिली. देशभरात झालेल्या एकूण नुकसानीपैकी ८ हजार १०० कोटी रुपये पुन्हा मिळवण्यात यश आल्याचंही ते म्हणाले. गेल्या वर्षी १९३० या सायबर गुन्हेगारी पीडितांसाठीच्या हेल्पलाईन क्रमांकावर ३० लाख तक्रारी दाखल झाल्या, त्यांच्यावरून १२ लाखापेक्षा जास्त सिम कार्ड्स, तर ३ लाखापेक्षा जास्त मोबाइल ब्लॉक करण्यात आले.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीनं दिले जाणारे २०२६ साठीचे ‘मधुमित्र’ आणि ‘मधुसखी’ पुरस्कार आज जाहीर करण्यात आले. लातूरचे

ज्ञानेश्वर मलीले, छत्रपती संभाजीनगरचे गणेश बुरकुल, बुलढाण्याचे राजेंद्रदास बैरागी आणि पुण्याच्या श्वेता वायाळ यांची यंदा या पुरस्कारांसाठी निवड झाली आहे.

**<><><><><>**

येत्या २४ तासात राज्यात कोकण, मध्यमहाराष्ट्र  आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा वाहण्याची आणि तुरळक पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. कोकणात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहील तर विदर्भात हवामान कोरडे असेल आणि तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येईल असा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

**//<><><><><>//**